## वितरक नेमणे आहेत

रायगड जिल्ह्यात वितरक नेमणे आहेत. नामांकित टाटा कंपनीच्या कॉपर वॉटर, फ्रुट ज्युसेस, ग्लुकोज ड्रिंक इत्यादी उत्पादनासाठी तालुका निहाय वितरक नेमणे आहेत.

संपर्क विहा एन्टरप्रायजेस, ९००४५६३२६६/८८८८५७०३९३



दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित



दैनिक रायगड नगरी

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Web : www.raigadnagari.com /
Email : raigad.nagari@gmail.com



● वर्ष १७ वे ● अंक १७४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२४ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


# शिवाजी पार्कवर ठाकरेंचाच दसरा मेळावा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**दसरा मेळाव्यासाठी शिवाजीपार्क मैदान देण्याच्या याचिकेवर उच्च न्यायालयात आज सुनावणी झाली. यामध्ये ठाकरे गट, शिंदे गट आणि पालिकेच्या वतीने युक्तीवाद करण्यात आला. शिंदे गट आणि ठाकरे गटाने उच्च न्यायालयात आम्हीच खरी शिवसेना आहोत, असा युक्तीवाद केला. न्यायालयाने तुमचा युक्तीवाद मर्यादेत ठेवा, निर्णयही द्यायचा आहे, असे तिन्ही बाजुंना सांगितले. या युक्तीवादानंतर न्यायालयाने शिवाजीपार्कवर दसरा मेळावा होणार? कोणत्या गटाचा होणार, यावर निर्णय दिला. ठाकरे गटाला दसरा मेळाव्यासाठी शिवाजीपार्कवर परवानगी देण्यात आली आहे.**

यावेळी उच्च न्यायालयाने सदा सरवणकर यांची हस्तक्षेप याचिका फेटाळली. उच्च न्यायालयाने पालिकेला तुम्हाला यापूर्वी असे अर्ज आले होते का? त्यावर त्यावेळी तुम्ही काय निर्णय घेतलात असा सवाल न्यायालयाने केला. यावर पालिकेने २०१७ मध्ये असा प्रसंग आला होता, तेव्हा दोन्ही गटांमध्ये परस्पर समजुतीने दसरा मेळाव्याला परवानगी देण्यात आली होती. परंतू आता परिस्थिती वेगळी आहे. हे प्रकरण समजुतीने सोडविण्यासारखे नाहीय, असा युक्तीवाद पालिकेने केला.

**ठाकरे गटाला परवानगी देताना न्यायालयाने कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आश्वासन घेतले. तसेच दोन ते सहा ऑक्टोबर शिवाजीपार्क वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. पोलिसांना संपूर्ण घटनेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याचे स्वातंत्र्य आहे. याचिकाकर्ते कोणत्याही घटनेला जबाबदार असल्याचे आढळल्यास, भविष्यात त्यांना तिथे दसरा मेळावा नाकारण्याचे कारण ठरू शकते, असे म्हणत पालिकेने आपल्या अधिकारांचा गैरवापर केल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.**

**ठाकरे गटाला शिवतिर्थावर मेळावा घेण्याची परवानगी मिळावी यासाठी ठाकरे गटाने उच्च न्यायालयात दाखल केली होती. यावर सदा सरवणकर यांनी हस्तक्षेप याचिका दाखल करत आम्हीच खरी शिवसेना आहोत, यामुळे शिवाजी पार्कची जागा आम्हाला मिळायला हवी अशी याचिका दाखल केली होती. यावर न्यायालयाने शिवसेना नेमकी कोणाची हा विषयच नसल्याचे म्हणत ही याचिका फेटाळाली आहे.**



यानंतर न्यायालयाने शिवाजीपार्कवर दसरा मेळावा गेली अनेक वर्षे होतोय. सरकारने ४५ दिवस अशा कार्यक्रमांसाठी राखीव ठेवलेले आहेत, अशी टिप्पणी केली. तसेच सर्वोच्च न्यायालयातील याचिकांवर या निकालाचा परिणाम होणार नाही. ही याचिका फक्त शिवाजी पार्कची जागा दसरा मेळाव्यासाठी दिली जावी यावर आहे, असेही न्यायालयाने सुरुवातीलाच स्पष्ट केले होते. पालिकेचा निर्णय हा वास्तविकतेला धरून नाही, पालिकेला परिस्थीती माहिती होती, असे मत न्यायालयाने नोंदविले. तसेच दादर पोलिसांचा अहवाल मान्य होण्यासारखा आहे, असेही न्यायालय म्हणाले.

### पेण अर्बन बँक घोटाळा प्रकरण.....

# संतप्त ठेवीदारांनी अकार्यक्षम प्रशासन व घोटाळेबाजांचे घातले श्राद्ध

**दै.रायगड नगरी । पेण**

**दि पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेच्या बँक घोटाळ्याला एक तप पूर्ण झाले असून १२ वर्षानंतरही न्याय न मिळाल्याने पेण अर्बन बँक संघर्ष समितीने आक्रमक पवित्रा घेत पेण अर्बन बँकेच्या ठेवीदार, खातेदारांनी अर्बन बँकेच्या मुख्यालयाबाहेर अकार्यक्षम प्रशासन व बँकेत कोट्यावधीचा घोटाळा करणाऱ्यांचे श्राद्ध घालून निषेध व्यक्त केला तसेच मागील बारा वर्षात मृत्युमुखी पडलेल्या पाचशेहून अधिक ठेवीदारांना यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली.**



या आंदोलनात संघर्ष संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष नरेंन जाधव, गजानन गायकर, दिलीप दुबे, पेणच्या नगराध्यक्षा प्रीतम पाटील, माजी नगरसेवक प्रकाश पाटील, नगरसेवक अजय शिरसागर, विभावरी भावे, नामदेव कासार, अंकिता पोटे, कुंदा खरे, मनोहर पाटील, मोहन वेखंडे, बाळकृष्ण कमळकर, सुहासिनी कदम यांच्यासह ठेवीदार व जेष्ठ नागरिक सामील झाले होते.

पेण अर्बन बँकेच्या घोटाळ्याबाजांच्या जप्त केलेल्या मालमत्तांचे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने व्यवहार सुरु आहेत या संदर्भात संबंधित यंत्रणेला वारंवार लेखी पत्र व्यवहार करूनही त्यांनी बघायची भूमिका घेतल्याने ठेवीदारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील बारा वर्षात ठेवीदारांनी अनेक आंदोलने केली. न्यायालयात व प्रशासकीय कार्यालयांमध्ये न्यायालयीन लढाई लढली. परंतु आरोपींनी प्रशासकीय अधिकाऱ्यांशी साटे-लोटे अल्याने अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही

बारा वर्षात न्याय न मिळाल्याने संतप्त झालेले ठेवेदार जिल्हाधिकारी कार्यालयात किंवा मंत्रालयात जाऊन आत्मदहन करतील असा इशारा पेण अर्बन बँक संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष नरेन जाधव यांनी यावेळी दिला. पेण अर्बन बँकेचे ठेविदार बारा वर्ष आस लावुन बसले आहेत आज माझे कष्टाचे पैसे येतील उद्या माझे कष्टाचे पैसै येतील बारा वर्ष साधे नाही आहेत. घोटाळेबाज स्वस्थ बसले आहेत. त्याचा

> ठेवी आमच्या हक्काच्या नाही कुणाच्या बापाच्या, निषेध असो निषेध असो बँक बुडव्यांचा निषेध असो, बँक बुडवणाऱ्या निषेध असो, मिळालाच पाहिजेत मिळालाच पाहिजेत आमच्या कष्टाच्या ठेवींच्या रक्कम आम्हाला मिळाल्याच पाहिजे अशा घोषणांनी पेण अर्बन बँकेच्या मुख्यालयाचा परिसर दणाणून गेला होता.

विचार सर्वसामान्य लोकांनी केला पाहीजे. ठेवीदारांचे संसाराची राख रांगोळी करण्याचे काम घोटाळेबाजानी केले आहे. ठेवीदारांचे पैसे परत मिळेपर्यत गप्प बसणार नसल्याचे नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सांगितले.

# नवीन पनवेल सिडको कार्यालयातील अधीक्षक अभियंता लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात

### ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडको कार्यालयातील दुरुस्ती कामाच्या बिलमंजुरी करीत आवश्यक असणाऱ्या अंतर्गत गुणवत्ता तपासणी अहवाल वर सही करण्याकरिता १५ हजारांची लाच स्वीकारणाऱ्या लोकसेवक अधीक्षक अभियंता सिडको कार्यालय नवीन पनवेल प्रकाश बालकदास मोहिले व त्यांचे सहकारी सेवानिवृत्त सहा. कार्यकारी अभियंता संजय हरिभाऊ डेकाटे यांना ठाणे लाचलुचपत पथकाने रंगेहाथ पकडले.



नवीन पनवेल सिडको कार्यालयाच्या संरचनात्मक दुरुस्ती केलेल्या कामाच्या बिलमंजुरी करीता आवश्यक असणाऱ्या अंतर्गत दुरुस्ती तपासणी अहवालावर स्वाक्षरी करण्यासाठी आरोपी अधीक्षक अभियंता प्रकाश बालकदास मोहिले यांनी तक्रार दार सबकॉन्ट्रक्टर यांच्या कडे पंधरा हजार रु. लाचेची मागणी केली होती.

त्याबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे यांच्या कडे रीतसर तक्रार केली होती. त्या अनुषंगाने ठाणे पथकाने सापळा रचला असता दि. २३-०९-२०२२ रोजी नवीन पनवेल सिडको कार्यालयातच अधीक्षक अभियंता प्रकाश मोहिले व त्यांचे सेवानिवृत्त सहकारी डेकाटे यांना तक्रारदार यांच्याकडून १५००० हजाराची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. अप्पर पोलीस आयुक्त पंजाबराव उगले आणि अप्पर पोलीस अधीक्षक अनिल घेरडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हि यशस्वी कारवाई करण्यात आली असून खांदेश्वर पोलीस ठाणे येथे या संबंधी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# घोणसे घाटात अपघात, सुदैवाने मनुष्य हानी टळली

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

अपघाता साठी ख्यातनाम असणाऱ्या पुणे दिघी F753 या राष्ट्रीय मार्गावरील माण-गाव - म्हसळा या रस्त्यावर तालुक्यातील घोणसे घाटातील तीव्र उतार आणि घोकदायक वळणावर टेंपोने चक्क सरंक्षक भिंतीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भिषण अपघातात टेंपोच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला तर टेंपोंतील तीघाना हाताला फॅक्चर, डोक्याला गंभीर मार आणि किरकोळ जखमा झाल्याचे ग्रामिण रुग्णालयाचे सूत्रानी सांगितले. MHO4-GF0371 हा टेंपो मुंबई पनवेल वरून श्रीवर्धन कडे सह-बँकेचे फर्नीचर घेऊन जात असताना माणगाव - म्हसळा रस्त्यावरील तालुक्यातील घोणसे घाटातील तीव्रउतार आणि घोकदायक वळणावर टेंपो भरधाव असल्याने .../२

# उरण पंचायत समिती गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी विना झाली पोरकी

**दै.रायगड नगरी । उरण**




उरण पंचायत समितीच्या रिक्त झालेल्या गटविकास अधिकारी, सहाय्य गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी पदी कायमस्वरूपी नियुक्ती न करण्यात आल्याने जनतेत व शिक्षक वर्गात नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे. एकंदरीत शासनाच्या उदासीन धोरणामुळे उरण पंचायत समितीचे कार्यालय गटविकास अधिकारी, सहाय्य गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी विना पोरकी तर झाली नाही ना अशी चर्चा सध्या रंगू लागली आहे

उरण पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती एन.एन गाडे या मे २०२२ रोजी सेवेतून निवृत्त झाल्या आहेत. त्यामुळे उरण पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी या रिक्त झालेल्या पदाचा चार्ज हा पनवेल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या कडे देण्यात आला आहे. मात्र संजय भोये हे पनवेल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी असल्याने उरण पंचायत समिती कार्यालय त्यांची उपस्थिती दर्शविली जात नाही. त्यातच सहाय्य गटविकास अधिकारी हे .../२

# स्कायवॉक होण्याआधीच पोलादपूर ग्रामदेवस्थानाच्या कमानीला तडे

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर शहरामध्ये अंडरपास मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ सुरू होण्याच्या ठिकाणी पोलादपूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री काळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थानाच्या कमानीला गेल्या काही दिवसांपासून मोठमोठे तडे गेलेले दिसून येत असून चौपदरीकरणादरम्यान प्रोकलेनचा धक्का लागल्याची माहिती प्रत्यक्षदशाअनी दिली आहे. अलिकडेच, याच परिसरात पुर्वेकडील प्रभातनगर ते पश्चिमेकडील प्रभातनगरला जोडणारा विद्यार्थी व नागरिकांना ये-जा करण्यासाठी स्काय वॉक उभारण्याची मागणी सुरू आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६चा मुंबई बाजूकडील वाहने येण्याच्या रस्त्याचा अंडरपासमध्ये प्रवेश होण्याच्या ठिकाणी पूर्व आणि पश्चिम बाजूचे सर्व्हिसरोड आणि गोव्याकडून येणारी तसेच मुंबईकडे जाणारी मार्गिका असे चारही रस्ते .../२





# जमीन व्यवहारात फसवणूक ; 3 जणांविरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

जमीन खरेदी-विक्री व्यवहारात फसवणूक झाल्याचे अनेक गुन्हे रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात घडत आहेत. असे असतांनाच नागोठण्याजवळील कोलेटी (ता.पेण) येथील एक व्यक्तीला जमीन घेऊन देण्याच्या मोबदल्यात लाखो रुपये उकळूनही त्या व्यक्तीला जमीन न मिळाल्याने पेण तालुक्यातील डोलवी, कांदलेपाडा व वडखळ येथील तीन जणांच्या विरोधात नागोठणे पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी उपलब्ध माहितीनुसार नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २८ डिसेंबर २०१८ ते ४ नोव्हेंबर २०१९ च्या दरम्यान हा गुन्हा घडला आहे. नागोठण्याजवळील कोलेटी ता.पेण येथील फिर्यादी मधुकर ठाकूर यांचे राहते घरात झालेल्या बैठकीती चर्चेत या तीन आरोपींनी फिर्यादी मधुकर ठाकूर यांना शेतपळस ता.रोहा येथील सर्व्हे नं २३, हिस्सा नं.अ, क्षेत्र ०-५१-९० या जागेमध्ये जमीन देण्यासाठी फिर्यादी यांचे नावे १ गुंठा जागेसाठी दिलेले ३ लाख १० हजार रुपये तसेच फिर्यादी यांचे वडिलांचे नावे जागेसाठी दिलेले ५ लाख रुपये व विटांचे ४० हजार रुपये असे एकुण ८ लाख ५० हजार रुपये रक्कम फिर्यादी यांचे कडुन स्विकारून अरोपी क्र. १ व २ सर्व रा.पेण यांनी वचन चिठ्ठी लिहुन देवुनही आजपर्यत जमीन फिर्यादी यांचे नावे खरेदी खत न करता संगणमताने रक्कमेचा अपहार करून फसवणुक केली आहे. याबाबत रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनंतर सदर प्रकरणी नागोठणे पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १२१/२०२२ भा.दं.वि.क. ४२०, ४०६, ४०९ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास नागोठण्याचे पोलिस निरिक्षक राजन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरिक्षक सचिन निकम हे करीत आहेत

# कोकण कृषी विद्यापीठाच्या वाहन चालक संघटनेतर्फे आदिवासी शेतकऱ्यांना विळे वाटप

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कोकण कृषी विद्यापीठाच्या वाहन चालक संघटनेने रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सामाजिक बांधीलकीची जाणीव ठेवून प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जत व विस्तार शिक्षण विभाग कृषी महाविद्यालय, दापोली यांच्या सहकार्याने कर्जत तालुक्याच्या चाहुची वाडी येथील २५ आदिवासी शेतकरी जोडप्यांना वैभव विळ्याचे मोफत वाटप केल्याने संघटनेचे कौतुक होत आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रादेशिक कृषी संशोधन, कर्जतचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. शिवराम भगत होते.व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण विभाग प्रमुख डॉ. प्रमोद सावंत,वाहन चालक संघटनेचे अध्यक्ष राजेश विचारे, विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने, संघटनेचे सचिव संजय पवार, कनिष्ठ संशोधन सहायक डॉ. प्रवीण झगडे, माजी उपसरपंच धर्मा निर्गुडा, विलास इलग, नवीन कांबळे, किसन ढोलेउपस्थित होते.




डॉ. सावंत यांनी आदिवासी शेतकरी बंधू-भगिनींच्या शेतीविषयक जिज्ञासा व कष्टाबद्दल प्रशंसा करीत वाहन चालक संघटना सातत्याने अत्यंत स्तुत्य व अनुकरणीय उपक्रम राबवित असल्याबाबत गौरवोद्गार काढले. आदिवासी उपयोजनेंतर्गत या भागात विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

डॉ. भगत म्हणाले की, वैभव विळ्याने भाताची कापणी जमिनीलगत होते. खोडकिडीचा प्रादुर्भाव कमी होतो व अधिक पेंढा मिळतो. या विळ्याची पकड अधिक चांगली असून, वजनास हलका, समतोल साधणारा, सहज कार्यक्षम कापणी करणारा असल्याने शेतकऱ्यांना खूपच उपयुक्त आहे. शेतकऱ्यांनी रासायनिक खते, कीटकनाशकांचा वापर कमी करून सेंद्रिय शेतीकडे वळावे व परंपरागत बियाणे जतन करावे, असा सल्ला त्यांनी दिला.

यावेळी राकेश विचारे, धर्मा निर्गुडा, विलास इलग यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुणे व मान्यवरांनी क्रांतिकारी आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन व दीप प्रज्वलन केले. याप्रसंगी डॉ. सावंत, डॉ. भगत व राजेश विचारे यांचा डॉ. मर्दाने यांच्या हस्ते तर सामाजिक कार्यात हिरीरीने सहभाग घेणारे किसन ढोले, सोनू जगताप यांचा डॉ. सावंत यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन भावपूर्ण सत्कार करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांच्या हस्ते आदिवासी शेतकरी जोडप्यांना ऐन हंगामात वैभव विळ्याचे वितरण करण्यात आल्याने त्यांनी आनंद व कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय पवार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ प्रवीण झगडे यांनी केले व आभार डॉ. रवींद्र मर्दाने यांनी मानले. कार्यक्रमाला सेवानिवृत्त वाहन चालक चंद्रकांत लोखंडे, मनोहर देशमुख, वाहन चालक प्रदीप ठाकूर, संतोष भोईर, विशाल बोरकर आवर्जून उपस्थित होते.

# माता सुरक्षित तर घर सुरक्षित मोहिमेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्याकरिता जिल्हा कृती दलाची बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यात माता सुरक्षित तर घर सुरक्षित ही मोहीम दि.२७ सप्टेंबर २०२२ राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्याकरिता जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, दि.२२ सप्टेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात जिल्हा कृती दलाची बैठक संपन्न झाली.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्यसंपर्क)डॉ. गजानन गुंजकर, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, जिल्हा प्रशासन अधिकारी शाम पोशट्टी, डॉ.प्रताप शिंदे, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी, डॉ.शितल जोशी, वैद्यकीय अधिकारी, पनवेल महानगरपालिका, भारतीय परिचारिका असोसिएशन तसेच अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रतिनिधी, शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या मोहिमेंतर्गत राज्यातील २१ वर्षावरील सर्व महिला माता, गरोदर स्त्रिया यांची आरोग्य तपासणी, प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे, सुरक्षित व सुदृढ आरोग्यसाठी समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे, जिल्ह्यातील ५४ प्राथमिक आरोग्य केंद्र, २८० आरोग्य केंद्रे, २ भरारी पथके व प्रत्येक गावात एक दिवस आरोग्य व पोषण दिनाच्या दिवशी आरोग्य सेवा उपलब्ध करण्यात येतील.

# महापालिका क्षेत्रात २६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर दरम्यान 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित ' अभियान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात २६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर दरम्यान 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित ' अभियान राबविण्यात येणार आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १८ वर्षावरील महिला ,माता, गरोदर स्त्रीया यांची सर्वांगीण तपासणी पालिका क्षेत्रातील सर्व सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवरती करण्यात येणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व महिलांनी या अभियानात सहभाग घ्यावा असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

या अभियानांतर्गत १८ वर्षावरील सर्व महिला, माता, गरोदर स्त्रीया यांची आरोग्य तपासणी , प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याअभियानासाठी एमजीएमचे स्त्रीरोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ तसेच पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील प्रसिध्द स्त्रीरोग रोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ आपली सेवा देणार आहेत. तसेच महिलांना व बालकांना फोलीक सीड, कॅल्शीअम, आयर्न अशी आवश्यकतेनूसारऔषधेही देण्यात येणार आहे.

तसेच याअभियानांतर्गत गर्भधारणापूर्व काळजी आणि मानसिक आरोग्य, स्तनपान, व्यसनमुक्ती, पोषण या विषयांवरती समुपदेशन कार्यक्रमही राबविण्यात येणार आहे. यासाठी नवविवाहित महिलांनी या अभियानांतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांशी संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात येणार आहे. याबरोबरच याअभियानांमध्ये सोनोग्राफी शिबिरही घेण्यात येणार आहे. यामध्ये चेस्ट एक्सरे, आवश्यकतेनूसार मॅमोग्राफी करण्यात येणार आहे. तसेच महिला व मातांचे हिमोग्लोबीन, रक्त-लघवी यांच्या तपासण्या मोफत करण्यात येणार आहे. माता-बालकांचे लसीकरणही करण्यात येणार आहे. ३० वर्षावरील स्त्रीयांचे कर्करोग,रक्तदाब, मधुमेह स्क्रीनिंग करण्यात येणार आहे.

'माता सुरक्षित तर घर सुरक्षित ' या अभियानात महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त महिलांनी सहभाग घेऊन आपली तपासणी करावी असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# दिव्यांग असल्याने क्रीडा संघटनेचे अध्यक्ष अरविंद प्रभू यांना विमानात नाकारला प्रवेश

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बाली येथे होणाऱ्या जागतिक पिकलबॉल स्पर्धे साठी निघालेल्या भारतीय पिकलबॉल संघटनेचे अध्यक्ष अरविंद प्रभू यांना दिव्यांग असल्याने व्हिएटजेट इंडिया एअरलाइन्सने विमानात प्रवेश नाकारल्याचा धक्कादायक प्रकार मुंबई विमानतळावर घडला आहे. या प्रकारामुळे प्रभू व्यथित झाले आहेत. बाली येथे २० ते २४ सप्टेंबरदरम्यान ही स्पर्धा होत असून या स्पर्धेत भारतासह जगभरातील १६ देश सहभागी होणार आहेत . अरविंद प्रभू हे माजी आमदार आणि मुंबईचे माजी महापौर रमेश प्रभू यांचे चिरंजीव आहेत. ९५ टक्के दिव्यांग असलेले अरविंद प्रभू व्हीलचेअरवर असतात . परदेशात विमानाने जायचे असेल तर त्यांच्याबरोबर अटेंडंट घेऊनच ते प्रवास करतात. पिकलबॉलच्या जागतिक स्पर्धेसाठी भारतीय संघ शनिवारी रात्री बालीला रवाना झाला. अरविंद प्रभू आणि त्यांच्या चार अटेंडंटचे खेळाडूंच्या विमानानंतर एका तासाने रात्री १.२५ चे विमान होते. त्यासाठी ते शनिवारी रात्री १० वाजता मुंबई विमानतळावर दाखल झाले. चेकिंग काउंटरवर व्हिएटजेट इंडिया एअरलाइन्सच्या कर्मचाऱ्याने प्रभू यांचा बोर्डिंग पास न देता त्यांच्यासोबत असलेल्या चार जणांचे बोर्डिंग पास दिले. लो कॉस्ट एअरलाइन्स असल्याने दिव्यांगांसाठी केबिन चेअर नसल्याचे सांगत प्रभू यांना प्रवास करता येणार नाही, असे व्हिएतनामच्या कर्मचाऱ्याने सांगितले.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.अजित नामदेव साकोरे, वय : ३५ वर्षे, व्यवसाय : व्यापार, शॉप नं.९, चॅनल प्लाझा प्रिमायसेस सोसायटी स्टेशन रोड, तक्का पनवेल, खालील भूखंड श्री.कुंडलिक गणू एडके व सौ.माया कुंडलिक एडके रा.१०४, शुभ आर्केड, प्लॉट नं.२२, सेक्टर २१, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांच्याकडून खरेदी करणार आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**सिडको १२.५% योजनेतील प्लॉट नं.२२४, सेक्टर ५३, द्रोणागिरी, ता.उरण, जि.रायगड क्षेत्र ३०० चौ.मी.**

सदर भूखंडावर कोणाचे काही येणे देणे विक्री, करार, गहाणखत, तारण, बक्षिस दिलेले असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसात वकीलाचे खालील पत्यावर संबंधित कागदपत्रासह लेखी हरकत द्यावी. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. आणि व्यवहार पूर्ण करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२३/०९/२०२२

**सही/-**
**ॲड.किशोर एम.केंडे**
**फ्लॅट नं.३, श्रावण को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.१८, माथेरान रोड, सेक्टर १२, नवीन पनवेल-४१०२०६**
**मो.नं.९२२६६५०२०१**

नमुना एन.डी.
(नियम ९२ (३) पहा)

**परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीशीचा नमुना**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र.MH46/1857 B 2015 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH 46 AC 1792 चे मालक श्री.संजय बाळु गायकर यांचे दि.३०/०४/२०२१ रोजी निधन झालेले आहे.

मी.श्रीमती.रेश्मा संजय गायकर, पत्ता : मु.१०१, पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे / प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे / प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

याबाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या / प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**सही/-**
**उत्तराधिकाऱ्याचे नाव : रेश्मा संजय गायकर**
**पत्ता : मु.१०१, पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**

मा.गुन्नाल सो

**ॲड.विलास पाटील**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) साहेब यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३६४/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२४/११/२०२२

सौ.जयश्री विजय खोडबोले
वय : ६३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.फ्लॅट नं.६०३, हरी निवास, प्लॉट नं.५५,
सेक्टर ३४, कामोठे, नवी मुंबई ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात कै.सुनील विजय खोडबोले यांचे वारस म्हणून वारसदाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे.

कै.सुनील विजय खोडबोले यांचा मृत्यू दि.०५/१०/२०२० रोजी अपोलो हॉस्पिटल इंटरप्रायजेस लिमिटेड, प्लॉट नं.१३, सेक्टर २३, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे झाला आहे. कै. सुनील विजय खोडबोले यांच्या मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीची खालील वर्णनाची सदनिका मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**३४, ''हरी निवास'' बिल्डींग, नोड कामोठे, नवी मुंबई**
**कारपेट क्षेत्रफळ : ३९.८८२ चौ.मी.**
**बिल्टअप क्षेत्रफळ : ४७.८५ चौ.मी.**
**टेरेस क्षेत्रफळ ४.८० चौ.मी.**

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारस हक्काबाबत कोणाचीही हरकत, अधिकार अथवा वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २३/०९/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

Indalkar Saheb

Adv.Manjit Kaur

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF JMFC PANVEL AT PANVEL
CRI.M.A.885/22
N.D.14/10/22

PINKY KAUR GURMEIR SINGH RANDHAWA
Residing at B-10/10/0-1, Y.M.C.A.,
SECTOR 4 CBD BELAPUR,
NAVI MUMBAI, THANE, KONKAN
BHAVAN, MAHARASHTRA 400614 Applicant
V/S
Registrar, Birth Death Registration
Panvel Municipal Corporation Respondent

Let if be known to all concerned that deceased late SUKHAVINDR DALBIRSINGH PANNO expired on 19/11/2018 at sadiya blossom sector 2, phase 1, plot no.177, room no. 303 therefore the applicants have filed the CRI. M.A. No.885/2022 APPLICATION U/S 13 (3) OF BIRTH AND DEATH REGISTRATION ACT 1979

If any person/s have any objection, or any kind of interest in the said matter, which is more particularly described in the schedule hereinabove, is hereby invited. Then they may appear in person or through their advocate, objection this application IN THE COURT OF JMFC PANVEL AT PANVEL, Dist-Raigad, Maharashtra. If no one appears and objects for the same within 30 days from the date of publication of this notice then this Hon'ble court will proceed to pass the necessary order thereon which please note.

Panvel
Date : 23/09/22

Sd/- Jr.Clerk JMFC Court Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superitent JMFC Court Panvel

Indalkar Saheb

Adv.Manjit Kaur

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF JMFC PANVEL AT PANVEL
CRI.M.A.1006/22
N.D.16/11/22

Mr.TRILOCHAN SINGH SANDHU
Residing at KL-6, BUILDING 6, FLAT-13
SECTOR-3E, KALAMBOLI, NAVI
MUMBAI, MAHARASHTRA-410218 Applicant
V/S
Registrar, Birth Death Registration
Panvel Municipal Corporation Respondent

Let if be known to all concerned that deceased late SAWINDER KAUR SANDHU expired on 20/01/2013 at KL-6, BUILDING 6, FLAT-13, SECTOR-3E, KALAMBOLI, NAVI MUMBAI, MAHARASHTRA-410218 therefore the applicants have filed the CRI. M.A. No.1006/2022 APPLICATION U/S 13 (3) OF BIRTH AND DEATH REGISTRATION ACT 1979

If any person/s have any objection, or any kind of interest in the said matter, which is more particularly described in the schedule hereinabove, is hereby invited. Then they may appear in person or through their advocate, objection this application IN THE COURT OF JMFC PANVEL AT PANVEL, Dist-Raigad, Maharashtra. If no one appears and objects for the same within 30 days from the date of publication of this notice then this Hon'ble court will proceed to pass the necessary order thereon which please note.

Panvel
Date : 23/09/22

Sd/- Jr.Clerk JMFC Court Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superitent JMFC Court Panvel

पृष्ठ क्र.१ वरुन...

## घोणसे घाटात अपघात, सुदैवाने मनुष्य हानी टळली

टेंपो चालकाचे वाहना वरील नियंत्रण सुटल्याने जोरदार अपघात झाला सदर अपघात आज शुक्रवार दि. २३ रोजी सकाळी ११ वा. झाला.यामध्ये १) शिवाजी मुकुंद बोटे वय ४०, २) बाळूभाई चौधरी वय ५४ ,३) अशोक नथू होंगे वय ३८ ( सर्व रहाणार घाटकोपर, मुंबई )ह्या हौद्यांत बसणाऱ्या तीघा मजुरांच्या अनुक्रमे फ्रॅक्चर, डोक्याला मार, किरकोळ दुखापती असे जखमांचे स्वरुप होते. टेंपोच्या केबीन मधील ड्रायव्हर आणि क्लिनर, अपघात गंभीर होऊनही बालंबाल बचावले.

अपघाताचे वृत्त कळताच देवघर येथील सामाजिक कार्यकर्ते अनिल महामुनकर, घोणसे तलाठी सुनिल भगत,अमोल शिगवण (महसुल विभाग ), ग्रामपंचायत कर्मचारी अक्षय खेडेकर यानी घटनास्थळी धाव घेऊन तीनही जखमीना कस्टमच्या जीपमधून म्हसळा ग्रामिण रूग्णालयांत उपचारासाठी पाठविले, त्यांचेवर डॉ.महामूद खडाटवीलकर यानी उपचार केले.

## उरण पंचायत समिती गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी विना झाली पोरकी

ही पद रिक्त आहे.त्यामुळे समस्या घेऊन ये- जा करणाऱ्या नागरीकांना कार्यालयात हेलपाटे मारावे लागत आहे.

उरण पंचायत समितीच्या शिक्षण विभागाचा कारभार ही ना घरका ना घटका असाच झाला आहे. या विभागातील रिक्त असलेले गटशिक्षणाधिकारी हे पद मागील पाच वर्षांपासून कायमस्वरूपी न भरल्याने निवृत्त शिक्षकांना तसेच शिक्षक वर्गांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. सध्या प्रभारी गट शिक्षणाधिकारी म्हणून प्रियांका पाटील यांच्या कडे चार्ज आहे. परंतु सक्षम, कायमस्वरूपी गटशिक्षणाधिकाऱ्याची नियुक्ती उरण पंचायत समितीच्या शिक्षण विभागात होत नसल्याने तालुक्यातील शिक्षणाचा दर्जा खालावत चालला असून अनेक गावातील प्राथमिक शाळांना कुलूप लावण्याची वेळ आली आहे.

## स्कायवॉक होण्याआधीच पोलादपूर ग्रामदेवस्थानाच्या कमानीला तडे

एकाच उंचीचे असलेल्या ठिकाणापासून पश्चिमेच्या दिशेला पोलादपूरचे ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्याची कमान आहे. पोलादपूर तालुका सरकारी कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या देणगीतून बांधण्यात आलेल्या या कमानीमुळे देवस्थानाची माहिती मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना होत असल्याने सर्वजण नतमस्तक होत असल्याचे दिसून येत असते. याठिकाणी चौपदरीकरणाच्या कामातील काही वाहने आणि यंत्रांची ये-जा सुरू होऊन काही अंतर आतील बाजूला असलेल्या मोकळ्या जागेवरून ही यंत्र आणि वाहने वळून पुन्हा महामार्गाकडे येत असताना एका प्रोकलेनचा धक्का कमानीला लागल्याने कमानीचा पिलर आणि वरील कमानीला तडा जाऊन काँक्रीटचा काही भाग कोसळल्याचे दिसून येत आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६च्या चौपदरीकरणाची ठेकेदार एलॲण्डटी कंपनीचे काही अभियंता श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थानपर्यंतचा रस्ता डांबरीकरण करून देण्याचे आश्वासन देऊन देवस्थानात दर्शन घेऊन गेले आहेत. मात्र, आता चक्क देवस्थानाच्या कमानीचीच हानी या चौपदरीकरणाच्या कामादरम्यान वाहने आणि यंत्रांची ये-जा करताना झाली असल्याने या कमानीची नव्याने उभारणी करण्याकामी देवस्थानाला भुर्दंड पडणार की ठेकेदार एलॲण्डटी कंपनी याकामी लक्ष देणार, असा सवाल पोलादपूरवासियांना पडला आहे. दरम्यान, याचठिकाणी चौपदरीकरणाचा रस्ता ओलांडण्यासाठी उंचावरून पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे ये-जा करण्यासाठी स्कायवॉक उभारण्याची मागणी जोर धरू लागली आहे तर नवरात्रौत्सव काळात असंख्य भाविक या कमानीखालून श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थानाचे दर्शन घेण्यासाठी मंदिर परिसरात येणार असल्याने या कमानीपासून जिविताचा धोका निर्माण झाला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रोख रक्कम खेचून मोटार सायकल वरून झाले पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोख रकमेचे बंडल पिशवीत घेऊन पायी चाललेल्या एका इसमाच्या हातातील पिशवी मोटर सायकल वरून आलेल्या दोघा अज्ञात इसमांनी खेचून ते पसार झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

मनिष म्हात्रे वय ४२ हे त्यांच्या ताब्यात असलेले वीस हजार रुपयांची रोख रक्कम घेऊन ते रस्त्याने पायी जात असताना युनिकॉर्न मोटरसायकल वरून आलेल्या दोघांपैकी एकाने त्यांच्या हातातील पैसे असलेली पिशवी खेचून ते पसार झाले. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## भरधाव गाडीच्या धडकेने दोघेजण जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील गार्डन हॉटेल सिग्नल जवळ एका भरधाव गाडीने मोटार सायकलीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटासायकलवरील दोघेजण जखमी झाल्याची घटना घडली आहे. संतोष माने हे त्यांच्या ताब्यातील गाडी घेऊन भरधाव वेगाने जात असताना त्यांनी हॉटेल गार्डन जवळील सिग्नल जवळ एका मोटार सायकलीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात हृत्विक कोडथे व त्याचा मित्र रोशन हे दोघे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पाली खोपोली मार्गावर जंगली पिर नदीकाठचे धोकादायक वळणावर संरक्षण कठडे बसविले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पाली खोपोली मार्गावरील जंगली पीर आंबा नदीकाठावरील धोकादायक वळणावर सुरक्षेच्या दृष्टीने संरक्षण कठड्याची नितांत आवश्यकता होती, अनेक ठिकाणचे संरक्षण कठडे तुटलेल्या अवस्थेत होते. संरक्षण कठड्याअभावी वेगवान वाहने नदीत कोसळून मोठी जिवीतहाणी होण्याची भिती असल्याने एम.एस.आर.डी.सी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली जात होती. यासंदर्भात पाली खोपोली मार्गावर संरक्षण कठड्या अभावी अपघाताचा धोका, प्रशासनाच्या डोळ्यावर पट्टी , या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध केले होते, या वृत्ताची दखल घेऊन पाली खोपोली राज्य महामार्गाच्या वहातुक सुरक्षेसह प्रशासनाने येथील धोकादायक वळणावर नवीन व तुटलेले कठडे तातडीने बसविण्यात आले आहेत. त्यामुळे वाहतूकदार



व प्रवाशी जनतेतून आभार मानले जात आहेत. या मार्गावर अनेक ठिकाणी धोकादायक वळणे व अपघाती क्षेत्र असूनही कोणतेही सूचना फलक याठिकाणी नाहीत, संरक्षण कठड्याच्या गंभीर समस्येकडे वृत्तपत्रातून आवाज उठविला, सामाजिक कार्यकर्त्या लताताई कळंबे यांनी या धोकादायक स्थितीबाबत आंदोलनाचा इशारा दिला होता.त्यामुळे प्रशासनाला जाग आली. आणि तातडीने उपाययोजना करण्यात आली.

वहातुक व प्रवासाच्या दृष्टीने जंगली पिरनजीक नदीकाठी संरक्षण कठडे असणे अत्यंत गरजेचे आहे. अरुंद व वळणाच्या रस्त्यावर नदीच्या बाजूने वेगवान वाहने जात येत असतात. यापुर्वी याठिकाणी अपघाती घटना घडल्या होत्या. अशातच वहानचालकाचा वहानावरुन ताबा सुटल्यास संरक्षण कठडे नसल्याने वहान खोल नदीत कोसळून मोठी जिवीतहाणी होण्याची भीती निर्माण झाली होती.

आंबेनळी घाटात झालेल्या अपघाताची पार्श्वभुमी पाहता संरक्षण कठड्याचे महत्व प्रशासनाने जाणून घेऊन हे कठडे बसविण्यात आले आहेत. एखादी दुर्घटना घडल्यानंतर घोडे नाचविण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये याकरीता योग्य ती उपाययोजना करुन आधिच खबरदारी घेणे अधिक उपयुक्त ठरते. असे आवाहन करण्यात आले होते, या आवाहनाला प्रतिसाद देत संबंधित प्रशासनाने धोकादायक मार्गावर सुरक्षेच्या दृष्टीने लोखंडी व पत्र्याचे संरक्षण कठडे बसविण्यात आले.

## पोलिसांकडून कारवाई होत नसल्याने श्रीवर्धन समुद्रकिनारी प्रेमीयुगुलांचे बीभत्स वर्तन सुरुच

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

पोलिसांकडून कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनार्यावरती प्रेमी युगुलांचे बिभत्स चाळे ही नित्याचीच बाब झाली आहे. श्रीवर्धन समुद्रकिनार्यापासून र.ना. राऊत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय अगदी हाकेच्या अंतरावर आहे. या शाळेमध्ये असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात बाहेर गावातून अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी शिकण्यासाठी येतात. श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर परिसरामध्ये जेवढी गावे आहेत त्या ठिकाणचे विद्यार्थी व विद्यार्थिनी या ठिकाणी येत असतात. कनिष्ठ महाविद्यालय सकाळी साडेअकरा वाजता सुटते. त्यानंतर यातील काही विद्यार्थी व विद्यार्थीनी अंगावर असलेल्या युनिफॉर्म सह समुद्रकिनार्यावरती बाकड्यां वरती बसून बिभत्स चाळे करताना आढळून येतात. ही प्रेमियुगुले प्रेम रसात एवढी तल्लीन झालेली असतात की, आजूबाजूने आपल्या कोणी जात आहे किंवा फिरत आहे याचे त्यांना भान देखील नसते. याव्यतिरिक्त श्रीवर्धन शहरात असलेल्या अनेक महाविद्यालयांमधील विद्यार्थी व विद्यार्थिनी देखील त्या ठिकाणी फेरफटका मारत असल्याचे पाहायला मिळते. मात्र त्यातील सुद्धा काही प्रेमी युगुले आडोशाला जागा पाहून त्या ठिकाणच्या बाकड्यावर बसलेली आढळतात. श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये जितक्या पोलिसांची नेमणूक आहे त्याच्यापेक्षा अर्धेच कर्मचारी कर्तव्यावर असतात. कारण बाकीची कर्मचाऱ्यांची पदे याठिकाणी भरली जात नाहीत. संख्याबळ कमी असल्यामुळे पोलिस दलाला देखील कामाचा ताण वाढलेला असतो. परंतु दुपारी साडेअकरा ते एक या वेळेमध्ये दामिनी पथक किंवा बीट मार्शल यांचा एखाद राउंड तरी समुद्रकिनाऱ्यावरची व्हायला पाहिजे. जेणेकरून बीभत्स वर्तन करणाऱ्या प्रेमीयुगुलांना आळा बसेल. तरी जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे या गोष्टीकडे गांभीर्याने पाहतील का? अशी मागणी श्रीवर्धनमधील नागरिकांकडून केली जात आहे.

## राकेश कोकळे यांचा धनगर समाजाच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील धनगर समाजाचे क्रियाशील अध्यक्ष राकेश कोकळे यांनी आपल्या अध्यक्ष पदाचा राजीनामा समाजाचे सचिव दीपेश ढेबे यांच्याकडे दि. २३ रोजी स्वखुशीने सुपूर्द केला यावेळी समाजाचे जेष्ठ सदस्य रामचंद्र ढेबे, मारुती कोकळे यांसह अन्य सदस्य उपस्थित होते.

राकेश कोकळे यांनी आपल्या पदाच्या कार्यकाळात अनेक सेवाभावी उपक्रम त्याचबरोबर एक सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी आपल्या मित्र परिवारा सोबत गावातील अनेक ठिकाणी श्रमदानातुन स्वच्छता मोहीम राबविण्यात यशस्वी झाले आहेत. स्मशानभूमीत श्रमदानाच्या माध्यमातून अग्निसंस्कार कामी लागणारी लाकडे गोळा करण्याचे काम असो अथवा गावातील एखादया प्रिय व्यक्तीच्या स्मरणार्थ चौक त्याचप्रमाणे स्मृतिस्तंभ उभारले असो,कोरोना काळात पशुखाद्य मिळविण्यासाठी सुध्दा त्यांचा च सिंहाचा वाटा आहे.सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे अशा प्रत्येक कामात राकेश कोकळे यांनी स्वतःला झोकून देत कामे मार्गी लावली आहेत.



त्यामुळे त्यांची लोकप्रियता संपूर्ण जिल्ह्यात सर्वदूर पसरली आहे. कोकळे यांनी आजवरच्या कार्यकाळात निस्वार्थी भूमिकेतून केलेल्या कामाचा काही उपद्व्यापी लोकांना आकस निर्माण झाल्याने त्यांनी समाजाला कुठल्याही प्रकारचे गालबोट लागू नये यासाठी स्वखुशीने सचिवांकडे राजीनामा दिला आहे.राकेश कोकळे सारख्या होतकरू आणि निस्वार्थी तरुणाने राजीनामा दिल्यामुळे सोशल मीडियावर अनेकांना दुःख झाल्याच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

# नवरात्रौत्सव आनंदाने साजरा करा : संदीप पोमन

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

नवरात्रोत्सव काळात राखण्यात येणाऱ्या सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीकोनातून दिघी सागरी पोलिसांनी गुरुवार, ता. २२ रोजी सायंकाळी५ वाजता नवरात्र उत्सवाच्या मंडळांसह, पोलीस पाटील व सरपंच, तंटामुक्त अध्यक्ष गाव अध्यक्ष यांची एक संयुक्त बैठक घेतली. दिघी सागरी पोलिस ठाण्यात ही बैठक पार पडली.सर्व नियम आणि अटींचे पालन करून उत्सव शांततेत पार पडण्यासाठी सहर्काय करण्याचे आवाहन पोलिसांनी यावेळी केले.

दिघी पोलिस स्टेशनचे सहा पोलिस निरीक्षक संदीप पोमन यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडली. मंडळानी शांतता, कायदा आणि सुव्यवस्था यांचे पालन करुन उत्सव साजरा करावा असे आवाहन त्यांनी केले आहे. ते पुढे म्हणाले की, श्रीवर्धन तालुक्यातील हिंदू – मुस्लिम एकता हे अनेकांसाठी आदर्श आहे. तो आदर्श कायम ठेवावा असे आवाहन उपस्थितांना केले. यावेळी बोलताना पोमन यांनी सांगितले की, गोपाळकाला, गणेशोत्सव व बकरी ईद हे सन जसे आनंदात केले तसेच नवरात्रोत्सव, धम्मचक्र परिवर्तन दिवस तसेच ईद ऊ मिलाद हे सन देखील आनंदात करा. आपल्या भागात गावठी दारुची बंदी आहे तरी सुद्धा बाहेरुन गावठी दारुची काहिजण तस्करी करत आहेत त्यांच्यांवर देखील पोलिस यंत्रणा कार्यवाही करत आहेत. पोलीस ठाण्यावर मोर्चा आनन्यासाठी आवश्यक त्या पूर्वपरवानगी घेणे आहे. अन्यथा कारवाई करण्यात येईल. तसेच नवरात्र उत्सवात गरबा न्रृत्य कार्यक्रमात महिलांची छेडछाड होणार नाही याकडे मंडळाच्या सर्व स्वयंसेवकांनी काळजी घ्यावी. यावेळी दांडगूरी चे श्रीपाद कवाडे मनोगत व्यक्त करताना सांगितले की, पावसाळ्यात रस्त्यालगत झाडी वाढली आ–हेत त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे म्हणून त्यासाठी दिघी सागरी पोलीस स्टेशन यांच्यामार्फत सार्वजनिक बांधकाम खात्याला पत्र देऊन वाढलेली झाडं झुडपे तोडावी असे सांगितले. श्रीवर्धन मतदार संघाचे अध्यक्ष महम्मद मेमन यांनी सांगितले की, जसे तीन धर्मांतील सण एका महिन्यात साजरे होत असतील तर तीन धर्मांतील जनता एकत्र का येऊ नये? त्यामुळे गावोगावी एकोपा राहू शकेल.

दिवेआगर सरपंच उदय बापट व वडवली आगरी समाज कार्याध्यक्ष चंद्रकांत बिराडी, मोहण चिरणकर यांनीही मनोगत व्यक्त केले. या बैठकीला श्रीवर्धन मतदार संघाचे अध्यक्ष महम्मद मेमन,दिवेआगर सरपंच उदय बापट, दांडगुरी सरपंच गजानन पाटील, वडवली आगरी समाज अध्यक्ष किशोर बिराडी,कार्याध्यक्ष चंद्रकांत बिराडी, दांडगुरी उपसरपंच दत्तात्रय पांढरकामे, श्रीपाद कवाडे, सुधाकर शेलार,नाना मोहिते,बोर्लीपंचतन आगरी समाज अध्यक्ष वैभव पाटील, शंकर गाणेकर,मोहण चिरणकर, पोलीस पाटील उद्देश वागजे,दिलीप नाक्ती,दिलीप खेडेकर यांच्यासह दिघी सागरी पोलीस ठाण्याअंतर्गत असलेल्या प्रत्येक गावातील नागरिक उपस्थित होते.


### महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, माणगांव

**जल जीवन मिशन ई–निविदा सुचना क्र.११ सन २०२२–२३**

मोरबा पाणी पुरवठा योजना, ता.माणगांव, जि.रायगड या कामाच्या निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित रक्कम रु.४.४० कोटी आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशिल दि.२६/०९/२०२२ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाचा सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

दि.१४/०९/२०२२

**सही/–**
**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग माणगांव**

क्र.आरओसी–२०२२/क्र.५/सी२९५६



मा.मुजावर सो

**ॲड.नेरश टी. म्हसकर**
**(पनवेल)**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३४१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.११/११/२०२२

श्री.मिन्नाथ जगन्नाथ केणी
रा.मु.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.भिमाबाई जगन्नाथ केणी ह्या दि.०६/१०/२०१४ रोजी मौजे : चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेली आहे. कै.भिमाबाई जगन्नाथ केणी यांचे सामाईक मालकीच्या मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती सिडकोतर्फे संपादीत झालेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| काळुंद्रे ७०/७९ (३) | काळुंद्रे | ९७ | २ ए | ०–०८–० | २.०० |
| काळुंद्रे ७०/७९ (२) | काळुंद्रे | ९७ | १ पै | ०–०३–७ | २.६२ |

वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टास अर्ज केला आहे. वरील मिळकतीत अर्जदार यांचा कायदेशीर हक्क व अधिकार असल्याने सदर मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२१/०९/२०२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गोडसे मॅडम

**ॲड.नेरश टी. म्हसकर**
**(पनवेल)**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.२ रे सह दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३४२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०९/११/२०२२

श्री.रामचंद्र गणा भगत
रा.घर नं.७७४, उसर्ली खुर्द, बंगलो रोड,
श्री समर्थ बैठक हॉल, पो.ओ.एन.जी.सी.,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.कृष्णाबाई उर्फ लक्ष्मी गणा भगत, ह्या दि.१८/०३/२०१४ रोजी मौजे : उसर्ली खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेली आहे. कै.कृष्णाबाई उर्फ लक्ष्मी गणा भगत यांचे सामाईक मालकीच्या मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती सिडकोतर्फे संपादीत झालेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| काळुंद्रे ७०/७९ (३) | काळुंद्रे | ९७ | २ ए | ०–०८–० | २.०० |
| काळुंद्रे ७०/७९ (२) | काळुंद्रे | ९७ | १ पै | ०–०३–७ | २.६२ |

वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टास अर्ज केला आहे. वरील मिळकतीत अर्जदार यांचा कायदेशीर हक्क व अधिकार असल्याने सदर मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२१/०९/२०२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



Adv.Santosh Ashok Thakur

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF J.M.F.C.PANVEL AT PANVEL
Other Misc. Cri. Application No. 713/ 2022
N.D.11/11/22

Mr.Ashok Harishchandra Shirdhonkar
Hindu Adult, Age 52 yrs. Occ, Service
R/at.House No. 60, Targhar
(Kombadbhuje) Ulwe-Panvel Road,
Tal- Panvel, Dist Raigad — Applicant
V/s.
The Sub Registrar,
Birth-Death, Registration,
Grampanchyat Targhar
(Kombadbhuje) Tal- Panvel,
Disl. Raigad — Respondent

That, the Grand-Aunt of Applicant PADIBAI VETYA SHIRDHONKAR, died on 31/07/1969 at Kombadbhuje, Tal. Panvel. Dist. Raigad That the Applicant had made Application before this Hon'ble Court for Order by this Court u/s. 13 (3) of registration of Birth and Death act 1969 for Registration of Death of PADIBAI VETYA SHIRDHONKAR with Respondent and issuance of death Certificate thereto.

**DETAILS OF DECEASED AND DEATH**

PADIBAI VETYA SHIRDHONKAR died on 31/07/1969 at Kombadbhuje, Tal. Panvel, Dist. Raigad.,

Whoever having objection in respect of the Registration of Death and issuance of Death Certificate of Deceased PADIBAI VETYA SHIRDHONKAR may kindly raise objection/ compliant before the Hon'ble JMFC Panvel at Panvel within 30 days from the Publication of this Public Notice. If no objection raised / complaints within the period as mentioned, then the application will be granted /considered in favor of applicant. No objection will be considered thereafter.

Given under my hand and seal on this 23 Day of 09/2022.

Sd/- Jr.Clerk JMFC Court Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superitent JMFC Court Panvel



Adv.Santosh Ashok Thakur

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF J.M.F.C.PANVEL AT PANVEL
Other Misc. Cri. Application No. 975/ 2022
N.D.11/11/22

Mr. Ashok Harishchandra Shirdhonkar
Hindu Adult, Age 52 yrs. Occ, Service
R/at.House No. 60, Targhar
(Kombadbhuje) Ulwe-Panvel Road,
Tal- Panvel, Dist Raigad — Applicant
V/s.
The Sub Registrar,
Birth-Death, Registration,
Grampanchyat Targhar
(Kombadbhuje) Tal- Panvel,
Disl. Raigad — Respondent

That, the Grand-Uncle of Applicant Vetya Padu Shirdhonkar died on 24/11/1953 at Kombadbhuje, Tal. Panvel. Dist. Raigad That the Applicant had made Application before this Hon'ble Court for Order by this Court u/s. 13 (3) of registration of Birth and Death act 1969 for Registration of Death of VETYA PADU SHIRDHONKAR with Respondent and issuance of death Certificate thereto.

**DETAILS OF DECEASED AND DEATH**

VETYA PADU SHIRDHONKAR died on 24/11/1953 at Kombadbhuje, Tal. Panvel, Dist. Raigad.,

Whoever having objection in respect of the Registration of Death and issuance of Death Certificate of Deceased VETYA PADU SHIRDHONKAR may kindly raise objection/compliant before the Hon'ble JMFC Panvel at Panvel within 30 days from the Publication of this Public Notice. If no objection raised / complaints within the period as mentioned, then the application will be granted /considered in favor of applicant. No objection will be considered thereafter.

Given under my hand and seal on this 23 Day of 09/2022.

Sd/- Jr.Clerk JMFC Court Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superitent JMFC Court Panvel

स्थापना - २०१६

# पनवेल महानगरपालिका

**करदात्यांना सुवर्णसंधी**

**30 सप्टेंबर पर्यंत शास्तीवर 50% सूट चा लाभ**

## सूट मिळवण्याचे अखेरचे ७ दिवस

करदात्यांनी जर या आधी १५% सूट चा लाभ घेतला असता तर एकूण ११८ कोटी रुपये लाभ झाला असता.

**१५%** सदर कालावधीत १२,०६१ लाभार्थ्यांनी रु. ४ कोटी २७ लाख सुट चा लाभ घेतला

**१०%** सदर कालावधीत ६,९७० लाभार्थ्यांनी रु. १४ कोटी ३१ लाख सुट चा लाभ घेतला

**५%** सदर कालावधीत ४७,२०४ लाभार्थ्यांनी रु. ३ कोटी ४ लाख सुट चा लाभ घेतला

## आज अखेर १८२ कोटी मालमत्ता कर जमा

## मालमत्ता कर भरा विकासाला हातभार लावा.